# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ९७-२२** **दिनांक :- ०१/०४/२०२२**

## आचोळे येथील बोगस डॉक्टरवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नाालासोपारा यांची कारवाई

दिनांक ३०/०३/२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना आचोळे पोलीस ठाण्याचे हद्दीत नालासोपारा पुर्व, रेल्वे स्टेशन प्लेटफॉर्म नं ४, गोकुळ बिल्डींगमधील गाळा नं.१६ मध्ये निशाद समशाद शेख नावाचा बोगस डॉक्टर नवशक्ती हेल्थ केअर नावाचे क्लिनिक चालिवत असल्याबाबतची गोपणीय माहीती मिळाली असता सदर बोगस डॉक्टर याची खातरजमा करणेकरीता व कारवाई करीता डॉ. सुधीर पांढरे, वैद्यकीय अधिकारी, नागरी आरोग्य केंद्र आचोळे नालासोपारा पुर्व व दोन पंच यांना बोलावुन घेतले .

त्यानंतर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा व त्यांचे पथक यांनी नालासोपारा पुर्व रेल्वे स्टेशन, प्लेटफॉर्म नं ४, गोकुळ बिल्डींगमधील गाळा नं. १६ मध्ये जावुन दि ३०/०३/२०२२ रोजी ६.४० वाजता छापा टाकला संशयीत डॉक्टर नामे निशाद समशाद शेख वय ३४ वर्षे रा. यादवनगर, जोगश्वरी पुर्व, मुंबई याने सादर केलेल्या प्रमाणपत्राबाबत त्याचेकडे अधिक विचारपुस करीता त्याने सदरचे वैदयकीय बनावट प्रमाणपत्र डॉ. शाहरुख खान उत्तरप्रदेश, हाथरस येथुन बनवुन घेतली असल्याबाबत सांगितले. म्हणुन आरोपी याचेविरुध्द रुग्णांची व महाराष्ट्र शासनाची फसवणुक केली तसेच बनावट दस्तऐवज खरा म्हणुन वापरीत असतांना मिळुन आला म्हणुन आचोळे पोस्टे गुन्हा रजि नं १५७/२०२२ भादंविसं कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ सह महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीस अधिनियम १९६१ चे कलम ३३, ३६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. डॉ. महेश पाटील, पोलीस उपायुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा वसई युनिटचे पोनि/संतोष चौधरी, सफौ/ पी. व्ही. निकम, पोहवा/ राजेश पदमने, बापु पवार, कांबळे, महेंद्र शेटये, किणी, मपोहवा/ साक्षी डोइफोडे, , मपोशि/ काजल पाटील, चालक पोना/ सुनिल पागी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.